वाटचाल ग्रामविकासाकडे...

# लघु सिंचन विभाग












# विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजना

१) पाझर तलाव व गावतलाव बांधणे

२) वळण बंधारे व साठवण बंधारे

३) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

४) जवाहर विहीर योजना

अ) तालुका समन्वय समीती

ब) जिल्हा समन्वय समीती-

५) को.प.बंधा-यांचे लोखंडी ढापे पावसाळयापुर्वी काढणे व पावसाळयानंतर बसविणे

६) जिल्हा नियोजन समिती अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना.

# लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद जळगाव

जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र १५,६२,०५८ हेक्टर असून हवामानाच्या दृष्टीने जिल्हयाचे दोन भाग पडतात. पश्चिम भाग हा डोंगराळ असून पावसाचे प्रमाण जास्त आहे तथापि जानेवारी ते जून या काळात पाणी टंचाई असते. पूर्व भाग पठारी असून प्रामुख्याने अवर्षण प्रवण आहे पूर्व भागामध्ये लागवडी लायक क्षेत्र मोठया प्रमाणात असल्याने शेतीसाठी पाण्याची मागणी मोठया प्रमाणात आहे. शेतीचे उत्पादन वाढविणेसाठी शासनामार्फत अनेक सिंचन योजनांची कामे हाती घेण्यात येतात. योजनांचे व्याप्तीनुसार शासनाचे तीन विभाग कार्यरत आहेत.

१) २५० हे पेक्षा अधिक सिंचन क्षमता असणारे मोठे प्रकल्प
   जलसंपदा विभागामार्फत महाराष्ट्र  कृष्णा खोरे विकास महामंडळ

२.) १०० ते २५० हे.दरम्यान सिंचन क्षमता असणारे प्रकल्प
   जलसंधारण विभागामार्फत लघुपाटबंधारे स्थानिक स्तर विभाग

३) ० ते १०० हें.दरम्यान सिंचन क्षमता असणारे लहान प्रकल्प

## जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग

जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागामार्फत १०० हे.पर्यन्त सिंचन क्षमतेच्या योजना राबविल्या जातात त्यामध्ये प्रामुख्याने खालील योजनांचा सामावेश होतो.

१) पाझर तलाव व गावतलाव

२) वळण बंधारे व साठवण बंधारे

३) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

४) जवाहर विहीरी

क्रमांक १ ते ३ या सामुहिक लाभाच्या योजना असून क्रमांक ४ ची योजना वैयक्तिक लाभाची आहे. ५ द.ल.घ.फु. (१५० सं.घ.मी.) पर्यन्तच्या सर्व लघुपाटबंधारे योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येतात. प्रति द.ल.घ.फु.व्दारे अंदाजे ६ ते ७ हेक्टर जमीन सिंचनाखाली येते.

५) जिल्हाधिकारी - सदस्य

६) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. -सदस्य

७) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी -सदस्य

८) कार्यकारी अभियंता सिंचन जि.प. -सदस्य सचिव

## को.प.बंधा-यांचे लोखंडी ढापे पावसाळयापुर्वी काढणे व पावसाळयानंतर बसविणे

जिल्हयात ० ते १०० हे.सिंचन क्षमतेचे १६५ को.प.बंधा-यांचे काम पुर्ण झालेल आहे.शासनाने को.प.बंधा-याचे सिंचन व्यवस्थापन,देखभाल व दुरुस्तीसाठी लाभ धारकांच्या सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्या बाबत सुचित केलेले आहे. तथापी लाभ धारकांकडुन अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे बंधा-यांचे गेट काढणे, बसविणे या बाबी वेळेवर होत नाही. परिणामी बांधा-यांमधून पाणी वाहून गेल्याने सिंचनाचा उद्देश सफल होत नाही.

**जिल्हा नियोजन समिती अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना.**

आजपर्यन्त लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत एकुण ४६८ पाझर तलाव तसेच ७५६ साठवण बंधा-यांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. पाझर तलावामुळे एकुण अंदाजे २७५७४ हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली असुन ७५६ साठवण बंधा-यांमुळे अंदाजे ६११४ हेक्टर जमीन ओलीताखाली आलेली आहे.

तसेच जिल्हयातील एकूण २८१ कामांची (पा.त.,सा.ब.,को.प.) दुरुस्ती थ्री आर योजनेअंतर्गत मंजूर असुन पुढील वर्षात सर्व कामे हाती घेण्यात येतील.

## संपर्क

| | |
|---|---|
| ग्रामपंचायत | - ग्रामसेवक |
| पंचायत समिती | - उप अभियंता,ल.पा.उपविभाग/गटविकास अधिकारी |
| जिल्हा परिषद | - कार्यकारी अभियंता लघुसिंचन विभाग जि.प.जळगाव |

**१) पाझर तलाव व गावतलाव बांधणे**

पावसाचे वाहून जाणारे पाणी मातीचे भराव टाकून जमिनीत मुरविणे पर्यायाने तलावाखालील विहीरींची पाणी पातळी वाढते.

**२) वळण बंधारे व साठवण बंधारे**

कठीण खडकाचा भुस्तर असलेल्या ठिकाणी साधारण १.५० ते ३ मिटर उंची पर्यन्त कॉक्रीटचा बांध घालून पावसाचे पाणी अडविले जाते.

**३) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे**

साधारण १.५० ते ३ मिटर उंची पर्यन्त कॉक्रीटच्या बांधाव्दारे पाणी अडवून सिंचनासाठी उपयोग.

**४) जवाहर विहीर योजना**

रोजगार हमी योजना अंतर्गत जवाहर विहीर योजना नविन विहीरींना प्रत्येकी १,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान.

शासन निर्णय नियोजन जविका २००२/प्र६८/रो१० दि.२४ मे २००२ अन्वये लाभार्थी निवडीसाठी दोन निवड समीत्या केलेल्या आहे.

**अ) तालुका समन्वय समीती**

| | |
|---|---|
| १)तालुक्याचे विधान सभेचे आमदार | -अध्यक्ष |
| २)पंचायतीचे सभापती | - सदस्य |
| ३)पंचायत समीतीचे उपसभापती | - सदस्य |
| ४)उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. | - सदस्य |
| ५)तहसिलदार | - सदस्य |
| ६)गट विकास अधिकारी पंचायत समीती | -सदस्य सचिव |

**ब) जिल्हा समन्वय समीती-**

| | |
|---|---|
| १) मा.पालकमंत्री | -अध्यक्ष |
| २) तालुक्याचे विधान सभेचे आमदार | -आमंत्रीत |
| ३) जिल्हा परिषद अध्यक्ष | -सदस्य |
| ४) जिल्हा परिषद उपाध्यक्ष | -सदस्य |